■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 07 ■ गुरूवार, 06 फेब्रुवारी 2025 ■ RNI NO.-2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू. 5

दैनिक **आरंभ मराठी**

arambhmarathi535@gmail.com

**विद्यार्थ्यांनी बनवल्या सिमेंटच्या कुंड्या**



>> सविस्तर वृत्त पान ३

**३४ रुपयांचे प्रमाणपत्र १०० रुपयाला**




>> सविस्तर वृत्त पान ४

# नोंदणी केलेल्या २२ हजार शेतकऱ्यांचा जीव टांगणीला

## ३० टक्के शेतकऱ्यांचीच सोयाबीन खरेदी, आज शेवटचा दिवस

## वाढीव सहा दिवसांच्या मुदतीत फक्त तीन हजार शेतकऱ्यांची खरेदी





आरंभ मराठी । धाराशिव

**सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्राचा उद्या (दि.६) शेवटचा दिवस असून, धाराशिव जिल्ह्यातील तब्बल २२ हजार सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसमोर गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. यापूर्वी ३१ जानेवारी हा खरेदी करण्याचा शेवटचा दिवस होता. राज्य सरकारने सहा दिवसांची मुदतवाढ देऊनही धाराशिव जिल्ह्यातील नोंदणी केलेल्या ३५ हजार ४०० शेतकऱ्यांपैकी तब्बल २२ हजार शेतकऱ्यांचा अजूनही नंबर आलेला नाही. जिल्ह्यातील नोंदणी केलेल्या फक्त ३० टक्के शेतकऱ्यांची खरेदी झाली आहे. खरेदी केंद्रांना मुदत वाढवून द्यावी यासाठी शेतकरी आक्रमक झाले असून तुळजापूर येथे संतप्त शेतकऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन केले.**

राज्य सरकारने सोयाबीन पिकाच्या बाजारातील कमी होत जाणाऱ्या किंमती पाहता हमीभावाने सोयाबीन खरेदी करण्याचा निर्णय सप्टेंबर महिन्यात घेतला होता. विधानसभा निवडणुका तोंडावर असल्यामुळे या निर्णयाचा फायदा निवडणुकीत होईल असा अंदाज महायुती सरकारने व्यक्त केला होता. हमीभाव खरेदी केंद्र सुरू करण्याचा हा निर्णय चांगला होता. परंतु, त्याची अंमलबजावणी करताना नियोजनाच्या अभावामुळे शासनाच्या या निर्णयाचा शेतकऱ्यांना फायदा होण्यापेक्षा मोठ्या प्रमाणावर तोटा झाला. सुरुवातीला खरेदी केंद्रांची संख्या कमी असणे, बारदाना उपलब्ध नसणे या कारणामुळे गेल्या तीन महिन्यातील ४० दिवस वाया गेले. खरेदी केंद्रांवर पुरेसे मनुष्यबळ नसणे, वाहतूक व्यवस्था नसणे, गोदामात जागा उपलब्ध नसणे या कारणांमुळे खरेदी केंद्र पूर्ण क्षमतेने चालू शकली नाहीत. सुरुवातीला जानेवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत खरेदी करण्यात येईल, असे सांगण्यात आले होते. पुढे ही मुदत ३१ जानेवारीपर्यंत वाढवण्यात आली. त्यांनंतर सहा दिवस मुदतवाढ देऊन ६ फेब्रुवारीपर्यंत खरेदी करण्याचे आदेश दिले. परंतु तरीही आतापर्यंत धाराशिव जिल्ह्यातील नोंदणी केलेल्या केवळ ३० टक्के शेतकऱ्यांचीच खरेदी होऊ शकली. नोंदणी केलेले ७० टक्के शेतकरी अजूनही प्रतीक्षेत आहेत.

धाराशिव जिल्ह्यात २१ खरेदी केंद्रांवर ३५ हजार ४०३ शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. त्यापैकी ५ फेब्रुवारी पर्यंत १२ हजार ४९७ शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी करण्यात आले आहे. म्हणजे आणखी २२ हजार शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी करणे बाकी असताना आज खरेदी केंद्र बंद करण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे शेतकरी संतप्त झाले असून, खरेदी करण्यासाठी मुदतवाढ द्यावी अशी एकमुखी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

३१ जानेवारी रोजी शासनाने सहा दिवसांची मुदतवाढ देऊन ६ फेब्रुवारी पर्यंत खरेदी करण्याचा निर्णय घेतला. परंतु या सहा दिवसात २१ खरेदी केंद्रांवर केवळ ३ हजार शेतकऱ्यांचीच खरेदी होऊ शकली.

## संतप्त शेतकऱ्यांकडून तुळजापूर शहरात रास्ता रोको




सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्रांना मुदतवाढ द्यावी या मागणीसाठी तुळजापूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी संतप्त होत बुधवारी (दि.५) रास्ता रोको आंदोलन केले. नोंदणी केलेल्या सर्व शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी केल्याशिवाय खरेदी केंद्र बंद करू नये अशी मागणी यावेळी शेतकऱ्यांनी केली. यावेळी मुख्य रस्त्यावरील वाहतूक बराच वेळ खोळंबली होती. या आंदोलनाला महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची खरेदी करण्यास लागू शकतात तीन महिने

धाराशिव जिल्ह्यात नोंदणी केलेले आणखी २२ हजार शेतकरी प्रतीक्षेत आहेत. नोव्हेंबर महिन्यात सुरू झालेल्या खरेदी केंद्रात आतापर्यंत केवळ १३ हजार शेतकऱ्यांची खरेदी झाली आहे. म्हणजे राहिलेल्या २२ हजार शेतकऱ्यांची खरेदी होण्यास आणखी तीन महिन्यांचा कालावधी लागू शकतो.

### धाराशिव जिल्ह्यातील आकडेवारी

- नोंदणी केलेले शेतकरी – ३५४०३
- SMS केले – २५१५७
- माल खरेदी केलेले शेतकरी – १२४९७
- प्रतीक्षेत असणारे शेतकरी – २२९०६

### शासनाकडून शेतकऱ्यांची मानसिक आणि आर्थिक पिळवणूक



राज्य सरकारने सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची निव्वळ थट्टा लावली आहे. धाराशिव जिल्ह्यातील एकूण उत्पादनापेक्षा केवळ ५ टक्के सोयाबीन खरेदी केले आहे. राजस्थान राज्यात १४ फेब्रुवारी पर्यंत मुदतवाढ मिळते मग महाराष्ट्रात का नाही? इतर शेतकऱ्यांची सोडा किमान नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची खरेदी होईपर्यंत सर्व केंद्र सुरू ठेवायला हवीत. हे सर्व शासकीय यंत्रणेचे अपयश आहे. शेतकऱ्यांची ही क्रूर थट्टा आहे.
**–कैलास पाटील, आमदार.**

## विवाहित महिलेवर लैंगिक अत्याचार

आरंभ मराठी । शिराढोण

कळंब तालुक्यातील एका गावातील एका चोवीस वर्षीय विवाहित महिलेवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना उघडकीस आली. एक २४ वर्षीय महिला (नाव– गाव गोपनीय) दिनांक १५ जानेवारी रोजी आपल्या घरात असताना गावातीलच एका तरुणाने तिला बळजबरीने मोटरसायकलवर बसवून त्याच्या शेतात नेवून तीच्यावर लैंगीक अत्याचार केला.तसेच घडल्या प्रकाराची कोठे वाच्यता केल्यास जीवे ठार मारण्याची धमकी तीला दिली. तसेच तरुणाने तिच्या नवऱ्यास तुच माझ्या मागे लागुन आली असे सांगुन तुझीच बदनामी करतो अशी धमकी दिली. पिडीत महिलेने दिनांक ४ फेब्रुवारी रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या.सं.कलम–६४, ८७, ३५१(२) अन्वये शिराढोण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे.

## कत्तलीसाठी नेण्यात येणाऱ्या आठ गाईंची सुटका; एकावर गुन्हा दाखल

आरंभ मराठी । वाशी



कत्तलीच्या उद्देशाने नेण्यात येणाऱ्या आठ गोवंशीय जनावरांची सुटका करून वाहनासह आरोपीला वाशी पोलिसांनी ताब्यात घेतले. आरोपी फैज्रान सरताज कुरेशी (वय १९ वर्षे, रा. खडकपुरा कुरेशी गल्ली धाराशिव) याला दिनांक ४ फेब्रुवारी रोजी त्याच्या ताब्यातील बोलेरो पिकअपमध्ये (क्र एमएच २५ एजे १७५०) पार्डी फाटा येथील रोडवर ८० हजार रुपये किंमतीच्या आठ जर्शी गाई घेऊन जात असताना ताब्यात घेतले. यावेळी वाहनासह एकुण ४,८०,००० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यांच्याविरुद्ध प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१), ११(१) (अ), ११(१)(एफ), ११(१)(एच), ११(१)(आय) सह महाराष्ट्र प्राणी सुरक्षा अधिनियम कलम ५(अ), ५(ब), ९(ब), ११ प्राण्यांचे परिवहन अधिनियम कलम ४७,५४,५६ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.




मकर संक्रातीपासून हवामानात बदल जाणवू लागला आहे. वातावरणातील गारठा संपून उष्मा वाढू लागला आहे. दिवसभराच्या प्रखर ज्वालानंतर सायंकाळी सूर्य मावळतीला जाताना आरिफ शेख यांनी टिपलेले दिलासादायक छायाचित्र.

## कंपाउंड धनुर्धारी अदिती, मधुरा, पूर्वश्या, प्रितीका ठरल्या रोप्यपदकाच्या मानकरी




आरंभ मराठी । देहराडून

देहराडून (उत्तराखंड) येथे चालू असलेल्या ३८ व्या नॅशनल गेम्समध्ये आर्चरी क्रीडा प्रकारातून कंपाउंड राउंड महिलामध्ये झालेल्या अतिशय अतितटीच्या अंतिम सामन्यात महाराष्ट्राच्या अदिती स्वामी, मधुरा धामणगावकर, प्रितिका प्रसाद, पुर्वशा शेंडे यांच्या संघास रोप्य पदकावर समाधान मानावे लागले. प्रतिस्पर्धी पंजाब संघाने सुवर्णपदक पटकावले आहे. डेहराडून येथील मुख्य क्रिकेट स्टेडियममध्ये अंतिम सामना अतिशय रंगतदार आणि अतितटीचा झाला. हवेच्या वेगात सुवर्णपदकासाठी दोन्ही संघातील धनुर्धारी फाईट करत होते. धनुर्धारींनी मारलेला बाणाचा प्रत्येकं वेध आणि त्यास मिळणारा प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद यामुळे सुवर्णपदकाची मॅच रंगतदार ठरली. १ फेब्रुवारीपासून चालू असलेल्या स्पर्धेत महाराष्ट्र धनुर्विद्या संघटना आणि महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेच्या वतीने खेळत असलेले कंपाउंड धनुर्धरी अदिती स्वामी ( सातारा ), मधुरा धामणगावकर व पूर्वस्या शेंडे ( अमरावती ), प्रितिका प्रसाद ( पिंपरी चिंचवड ) या महिला संघाने उपांत्यपूर्व सामन्यात उत्तराखंड संघावर २३३ – २१४ गुणांकाने, उपांत्य सामन्यात तेलंगणा संघावर २२९–२२८ गुणांकाने मात करत अंतिम सामन्यात प्रवेश केला. अंतिम सामना पंजाब संघाने २२९ – २२८ गुणाने म्हणजेच एका गुणाने जिंकत सुवर्णपदक पटकावले. महाराष्ट्र संघास यावेळी रोग पदकावर समाधान मानावे लागले. कंपाउंड महिला संघाचे संघ मार्गदर्शक म्हणून प्रवीण सावंत यांनी यावेळी काम पाहिले. सुवर्णपदकासाठी खेळत असलेल्या महाराष्ट्राच्या महिला खेळाडूंना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेचे उपाध्यक्ष तथा पथक प्रमुख संजय शेटे, आर्चरी संघ व्यवस्थापक प्रवीण गडदे, संघ मार्गदर्शक प्रवीण सावंत, अमर जाधव, समीर मस्के, कुणाल तावरे आदींसह खेळाडूंची उपस्थिती होती.

## आत्महत्येस प्रवृत्त केल्याबद्दल तिघांवर गुन्हा दाखल

आरंभ मराठी । धाराशिव

तरुणास आत्महत्येस प्रवृत्त केल्याबद्दल धाराशिव तालुक्यातील तिघांविरुद्ध आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासंबधी सविस्तर वृत्त असे की, गणेश अंबऋषी वाघमारे (वय ३५ वर्षे, रा.सोलापूर रोड, बार्शी) यांनी दिनांक १९ जानेवारी रोजी आपल्या राहत्या घरात गळफास घेवून आत्महत्या केली. यातील आरोपी शशिकात शिंदे, सुरज शिंदे, महेश कदम (सर्व रा. शिंगोली) यांनी मयत गणेश यास धाब्यावरील कामासाठी पाच हजार रुपये उचल दिली होती.

गणेश हा कामासाठी गेला असता आरोपींनी कामासाठी घेतलेले उचलीचे पैसे परत का देत नाही असे म्हणून जातीवाचक शिवीगाळ केली. तसेच तु जर आमचे पैसे परत दिले नाहीस तर तुझ्यावर पोलीस केस करतो व तुझे काय करतो ते बघ म्हणुन धमकी दिल्याने त्यांच्या त्रासास कंटाळून गणेश यांनी आत्महत्या केली. मयताची बहिण शुभांगी संतोष शिनगारे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या.सं.कलम–१०८, ११५(२),३५२, ३५१(२)(३) सह ३(१)(आर)(एस) अ.जा.ज.प्र.का. १९८९ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## महिलांना वृक्ष भेट घेऊन यशदा परिवाराने साजरा केला हळदी-कुंकु समारंभ



आरंभ मराठी । धाराशिव

यशदा मल्टीस्टेटच्या वतीने रथ सप्तमीनिमित्त पर्यावरणपूरक संदेश देणारा हळदी–कुंकू समारंभ आयोजित करण्यात आला. वाण म्हणून महिलांना रोपांचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला यशदा मल्टीस्टेटच्या महिला सभासद तसेच शहरातील विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. यशदा मल्टीस्टेटचे चेअरमन सुधीर सस्ते यांच्या सुविद्य पत्नी सुप्रिया सस्ते यांनी महिलांना वृक्षाचे वाण देत पर्यावरण रक्षणाचा तसेच झाडे लावा, झाडे जगवाचा संदेश दिला.

या हळदी– कुंकु समारंभासाठी शुभांगी कैलास पाटील, मकरंदराजे निंबाळकर यांच्या पत्नी तसेच प्रेमाताई पाटील, डॉ. मंजुळा पाटील, डॉ.गिलबिले मॅडम,डॉ.गरड मॅडम यांच्यासह समाजातील प्रतिष्ठीत महिला उपस्थित होत्या.यानिमित्ताने मल्टीस्टेटचा परिसर सुशोभित करण्यासाठी विविधरंगी पतंग वापरण्यात आले होते. विविध पतंगांद्वारे सामाजिक उद्बोधन करण्यात आले. पाणी वाचवा, प्लास्टीकचा वापर टाळा, प्रदूषण टाळा, निसर्गाचे रक्षण करा, असे संदेश देणारे पतंग लावण्यात आले होते. महिलांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात आणि अत्यंत हर्षोल्हासात हा कार्यक्रम पार पडला.

## गानकोकिळा भारतरत्न लता मंगेशकर

आपल्या मंजुळ आवाजाने संपूर्ण जगाला मोहिनी घालणारी भारताची गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांचा आज तिसरा स्मृतिदिन. लता मंगेशकर यांचा आवाज म्हणजे जगातील आठवे आश्र्चर्य होते. त्यांचा आवाज म्हणजे रसिकांसाठी मोठी पर्वणीच होती. लता मंगेशकर यांचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ रोजी इंदूर येथे एका गोमंतकीय कुटुंबात झाला. लता दिदींना गायनाचा वारसा त्यांच्या वडिलांकडून मिळाला. त्यांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक आणि नाट्य अभिनेते होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी गायनाचे धडे गिरवले. तेच त्यांचे गायनातील पहिले गुरू होते. लता दिदींना लहानपणी हेमा नावाने हाक मारली जायची पण मास्टर दीनानाथ यांच्या एका नाटकातील नाव लतिका असे होते या नावावरूनच त्यांनी त्यांचे नाव लता असे ठेवले. हेच नाव आज जगातील आठवे आश्र्चर्य ठरले. आपल्या वडिलांच्या संगीत नाट्यात त्यांनी वयाच्या पाचव्या वर्षी काम केले. वयाच्या तेराव्या वर्षी लता दीदींनी गायन क्षेत्रात पाऊल ठेवले आणि १९४२ साली त्यांनी आपले पहिले गाणे रेकॉर्ड केले. किती हसाल ? या चित्रपटातील नाचू या गडे खेळू सारे..... हे गाणे त्यांनी गायले मात्र या गाण्याचा चित्रपटात समावेश झाला नाही. त्याचवर्षी मंगळागौर या चित्रपटात नटली चैत्राची नवलाई.... हे गाणे गायले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी काही मराठी चित्रपटात गाणी गायली. लता दिदींचे खूप गाजलेले पहिले गाणे म्हणजे १९४९ सालच्या महल चित्रपटातील खेमचंद प्रकाश या संगीतकाराने स्वरबद्ध केलेले आयेगा आनेवाला.... हे गाणे इतके लोकप्रिय झाले की त्यांच्याकडे संगीतकरांची रांग लागली. त्यांनी गायलेली गाणी लोकप्रिय होऊ लागली. १९५० नंतर दिदींचा उत्कर्षाचा काळ सुरू झाला. त्या काळातील नौशाद, सज्जाद, वसंत देसाई, दत्ता डावजेकर यासारखे जुने आणि त्या काळात उदयाला येणारे एस डी बर्मन, सी रामचंद्र, शंकर – जयकिशन, मदन – मोहन, उषा खन्ना, कल्याणजी – आनंदजी, रवी, लक्ष्मीकांत – प्यारेलाल, आर डी बर्मन अशा सर्वच संगीतकारांकडे दीदी गाऊ लागल्या. या सगळ्यांकडे गायलेल्या दिदींच्या गाण्याला अमाप लोकप्रियता मिळत गेली. त्यांच्या आवाजाने रसिक तृप्त होत गेले. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. त्या युद्धात भारताचे शेकडो जवान धारातीर्थी पडले. या शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी २७ जून १९६३ रोजी दिल्लीत एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी एक खास गीत कवी प्रदीप यांनी लिहिले आणि सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केले होते. ते गीत लता दीदींनी गायले. ते गीत आजही लोकप्रिय असलेले ये मेरे वतन के लोगो....... हे गीत ऐकून तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना आपले आश्रू आवरता आले नाही. मराठीतही दीदींनी असंख्य गाणी गायली. आनंदघन या नावाने दीदींनी काही चित्रपटांना संगीतही दिले. जवळपास सात दशके आपल्या मंजुळ आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या लता दीदींनी जवळपास एक हजार चित्रपटातून ३० हजारांहून अधिक गाणी गायली. मराठी, हिंदीसह २० हुन अधिक प्रादेशिक भाषेत त्यांनी गाणी गायली. आपल्या अलौकिक स्वरांनी चित्रपट सृष्टीवरच नव्हे तर संपूर्ण देशावर वेगळा ठसा उमटवणाऱ्या लता दिदींचे संगीत क्षेत्रातले योगदान पुढील १०० पिढ्यांना विसरता येणार नाही. जगभरातील कोट्यवधी संगीत प्रेमींच्या कानाला तृप्त करणारा दैवी स्वर हरपला असला तरी त्यांच्या आवाजाच्या परिसस्पर्शाने अजरामर झालेल्या गीतांच्या माध्यमातून हा स्वर अनंतकाळ आपल्या मनामध्ये गुंजन करत राहणार आहे. दैवी स्वरांची देणगी लाभलेल्या गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# नकोशी ती!

आई, मला जन्म दे... मी जगू का?–एक निष्पाप जीव आईच्या उदरात असताना विचारते. पण दुर्दैवाने, समाजातील काही विकृत मानसिकता तिच्या या हाकेला उत्तर द्यायच्या आधीच तिला संपवते. कोणत्याही नवजात अर्भकाला जगण्याचा समान हक्क असतो, मग तो मुलगा असो वा मुलगी. पण समाजाच्या डोळ्यांत एक मुलगी जन्माला येणे अजूनही पाप समजले जाते. प्रेमसंबंधांमधून अथवा अनैतिक संबंधांमधून जन्माला आलेल्या निष्पाप जिवांना नकोशी ठरवले जाते. समाजाच्या तथाकथित प्रतिष्ठेपुढे त्या अर्भकाचा जीव काहीच नाही, म्हणूनच अनेकांना ती नकोशी वाटते.

प्रेमसंबंधातून जन्मलेली असो वा विवाहाबाहेरच्या नात्यातून आलेली, त्या निष्पाप जीवाचा काहीही दोष नसतो. पण तरीही ती जन्माला आली की लाजेखातर तिला फेकून दिले जाते, अनाथाश्रमात टाकले जाते किंवा अज्ञातवासात जगायला भाग पाडले जाते. समाजाने उभ्या केलेल्या तथाकथित नियमांमध्ये तिच्या अस्तित्वाला स्थान नसते. पुरुषांनी केलेल्या चुकांचे दडपण स्त्रियांवर टाकले जाते आणि त्याच चुकांचा परिणाम त्या जन्मलेल्यावर होतो. पोटात असतानाच तिचे गर्भलिंग निदान करून तिचा निकाल लावला जातो. ती जन्मलीच, तर कधी नदीच्या काठावर, कधी कचराकुंडीत, कधी मंदिराच्या पायऱ्यांवर तिला वाऱ्यावर सोडले जाते.

वंशाला दिवा हवा, मुलगा हवा, पण मुलगी मात्र नको–ही मानसिकता आजही अनेक ठिकाणी ठाम आहे. बाळाच्या जन्माआधीच लिंग तपासून मुलगी असल्यास गर्भपात करण्याचा अमानुष निर्णय घेतला जातो. डॉक्टरांनीही जबाबदारीने वागायला हवे, पण काही व्यावसायिक वृत्तीचे लोक गर्भलिंग निदानाच्या बदल्यात मोठी किंमत उकळतात आणि एका जीवाला संपवण्यास हातभार लावतात. त्यामुळे स्त्री–पुरुष प्रमाण ढासळले आहे. पुढे जाऊन हेच समाजासाठी धोकादायक ठरत आहे.

काहींना मुलगी नको असते कारण तिला वाढवण्याचा, शिकवण्याचा, तिच्या लग्नाचा खर्च परवडणार नाही, ही भीती असते. हुंड्याची परंपरा कितीही बंद करण्याचा प्रयत्न झाला तरी काही ठिकाणी अजूनही मुलीच्या जन्मासोबतच तिच्या हुंड्याचा विचार सुरू होतो. 'मुलगी म्हणजे ओझं' ही कल्पनाच चुकीची आहे. मुलगीही मुलासारखी सक्षम होऊ शकते, उच्च शिक्षण घेऊ शकते, घराचे, समाजाचे नाव उज्वल करू शकते. पण तिच्या अस्तित्वालाच जर संधी दिली जाणार नसेल, तर तिची गुणवत्ता दाखवायची संधीच कुठे मिळणार?

समाजातील एका बाजूला अशी क्रूरता असताना दुसऱ्या बाजूला काही माणसांनी मात्र या नकोशा ठरवलेल्या जिवांना जीव लावला. अशाच समाजसेवकांमध्ये सिंधुताई सपकाळ यांचे नाव अग्रस्थानी आहे. ज्यांना त्यांच्या जन्मदात्यांनी नाकारले, त्या अनेक अनाथ मुलींना सिंधुताईंनी आईचा आधार दिला. समाजाने टाकून दिलेल्या या मुलींना त्यांनी वाढवले, शिक्षण दिले आणि स्वतःच्या पायावर उभे राहण्याची संधी दिली. त्यांच्या मायेच्या कुशीत वाढलेल्या अनेक अनाथ मुली आज डॉक्टर, वकील, इंजिनिअर, समाजसेवक झाल्या आहेत. त्या स्वतः एकट्या असताना हजारो अनाथांचे जीवन घडवणारी बनल्या. समाजाने वाऱ्यावर सोडलेल्या मुलींना त्यांनी केवळ जीवदान दिले नाही, तर त्यांचे संपूर्ण आयुष्य उज्वल केले.

फक्त सिंधुताईच नाहीत, तर अनेक सेवाभावी संस्थाही याच कार्यासाठी झटत आहेत. अनाथाश्रम, महिला पुनर्वसन केंद्रे, विविध सामाजिक संस्था अशा मुलींचे संगोपन करत आहेत. समाजातील सजग घटकांनीही यात पुढाकार घेतला पाहिजे. एखाद्या निष्पाप जीवाला मायेचा हात मिळाला, शिक्षण मिळाले, तर ती मुलगीही भविष्यात समाजाचा आधार होऊ शकते. फक्त मानसिकता बदलण्याची गरज आहे.

स्त्री जन्माला येणं म्हणजे पाप नव्हे, ती दैवी देणगी आहे. जिच्या कुशीतून हे संपूर्ण जग जन्म घेतं, तिच्या अस्तित्वालाच जर आपण नाकारू लागलो, तर हा समाज कसा पुढे जाणार? मुली नको असतील, तर उद्याच्या पिढ्या निर्माण कशा होणार? प्रत्येक स्त्री ही केवळ माता, बहीण, मुलगी किंवा पत्नी नसून तीही एक स्वतंत्र व्यक्ती आहे. तिचं अस्तित्व केवळ कुटुंबापुरतं मर्यादित नाही, तर ती समाज घडविणारी आहे. गर्भलिंग निदानाविरोधात कडक कारवाई झाली पाहिजे. मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य दिलं पाहिजे. हुंडा प्रथेविरोधात समाजानेच जागरूकता निर्माण केली पाहिजे. विवाहबाह्य संबंधांमधून जन्मलेल्यांना अनाथ न ठेऊन त्यांच्यासाठी सुरक्षित पर्याय शोधले पाहिजेत. कोणत्याही नवजात जीवाला त्याच्या जन्मासाठी दोष देता कामा नये. समाजाने याबाबत अधिक संवेदनशील बनले पाहिजे.

नकोशी ती हा शब्दच मुळात अस्तित्वात नसावा. प्रत्येक जीव हा जसा जन्माला यायचा अधिकार बाळगून असतो, तसाच तो जगण्याचा, वाढण्याचा, शिकण्याचा आणि पुढे जाण्याचा हक्कही बाळगतो. मानसिकतेत बदल घडवून समाजातील या अनिष्ट प्रथांना दूर करणं हे आपलं सामूहिक कर्तव्य आहे. जगाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात एकच आवाज असला पाहिजे–ती नकोशी नाही, तीच समाजाची ताकद आहे!



प्रविण जरीचंद माळवदे
मो नं -८६०५५३११९९
धाराशिव

## तुगांव येथे राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत ११० महिलांची आरोग्य तपासणी

**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिव जिल्हा परिषदेच्या राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत धाराशिव तालुक्यातील तुगांव येथे ११० महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. सध्या महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोगाचे प्रमाण वाढत आहे. वेळीच तपासणी करून निदान झाल्यास योग्य उपचाराने स्तनाचा कर्करोग बरा होतो. परंतु भीतीपोटी किंवा लाजून महिला तपासणी करण्यास टाळाटाळ करतात. विशेषतः ग्रामीण भागातील महिला तपासणी करण्यास नकार देत असल्याचे निदर्शनास येते असे मत डॉ. स्वप्नगंधा कुलकर्णी यांनी व्यक्त केले. केंद्र शासन आणि राज्य शासनाच्या वतीने महिलांच्या विविध आजाराबाबत अनेक योजना आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येत आहेत. समाज माध्यमातून आणि प्रसारमाध्यमातून जनजागृती करण्याचे खूप प्रयत्न केले जातात. तरीही ग्रामीण भागातील अनेक सामान्य महिला वंचितच राहतात. केवळ माहिती न मिळाल्यामुळे अशा महिला विविध आजारांना बळी पडतात. गावातील सुशिक्षित महिलांनी पुढाकार घेऊन आपापल्या शेजारील, नात्यातील आणि मैत्रिणी महिलामध्ये आरोग्याविषयी योजनांची माहिती देऊन जनजागृती करण्याची गरज असल्याचे मत तुगावच्या पोलीस पाटील श्रुतिका हाजगुडे यांनी मांडले. उपस्थित महिलांना आरोग्यविषयक माहिती देताना डॉ. क्रांती भिसे यांनी स्तनाच्या तोंडातून द्रव बाहेर येणे, स्तनामध्ये गाठी येणे, स्तनाचा आकार कमी जास्त होणे, स्तन किंवा काखेजवळ सूज येणे, वेदना होणे, स्तनावर लालसर पुरळ येणे अशी लक्षणे दिसताच जवळच्या आयुष्यमान भारत आरोग्यवर्धनी केंद्रात जाऊन तपासणी करून घेण्याचे आवाहन केले. डॉ.मयुरी जाधव यांनी उपस्थित महिलांचे आभार व्यक्त केले. शिबीर यशस्वीतेसाठी तुगावच्या आशा कार्यकर्त्या ज्योती भुतेकर, शैला शेंडगे अंगणवाडीताई जानका भुतेकर, पोलीस पाटील श्रुतिका हाजगुडे यांनी प्रयत्न केले.



## श्रीपतराव भोसले ज्युनिअर कॉलेजचे प्रा. गर्जे यांना 'साने गुरुजी गुणवंत शिक्षक पुरस्कार' प्रदान



**आरंभ मराठी । धाराशिव**

श्रीपतराव भोसले ज्युनिअर कॉलेज, धाराशिव येथे कार्यरत असलेले प्राध्यापक पी. ए. गर्जे यांना अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला जिल्हा समिती, धाराशिव यांच्या वतीने साने गुरुजी जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. गर्जे यांना हा पुरस्कार शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब येथे आमदार कैलास पाटील, शिक्षणतज्ञ एम. डी. देशमुख सर आदी मान्यवरांच्या हस्ते प्रधान करण्यात आला. स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. हा पुरस्कार शैक्षणिक क्षेत्रात काम करत असताना सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा व साहित्य यामध्ये केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो.

यानिमित्ताने श्रीपतराव भोसले ज्युनिअर कॉलेज, धाराशिव येथे देखील प्राचार्य एन. आर. नन्नवरे, उपप्राचार्य एस. के. घार्गे यांनी गर्जे यांचा शाल व बुके देऊन सत्कार केला. या पुरस्काराबद्दल संस्थाध्यक्ष सुधीर पाटील, सरचिटणीस प्रेमाताई पाटील, संस्थेचे सीईओ आदित्य पाटील, प्रशासकीय अधिकारी एस. एस. देशमुख, उपमुख्याध्यापक प्रमोद कदम सर, पर्यवेक्षक एम. व्ही. शिंदे तसेच सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक व अभिनंदन केले.

## विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. अशोक राणा यांची निवड

**आरंभ मराठी । छत्रपती संभाजीनगर**

छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित १९ व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी लोकसाहित्य व संस्कृतीचे अभ्यासक, इतिहास संशोधक व भाषातज्ञ डॉ. अशोक राणा (यवतमाळ) यांची निवड करण्यात आली आहे. विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या अध्यक्ष प्रा. प्रतिमा परदेशी यांनी पत्रकार परिषदेत ही घोषणा केली. डॉ. अशोक राणा हे १८ व्या विद्रोही साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ग्रामीण साहित्यिक डॉ. वासुदेव मुलाटे यांच्याकडून सूत्रे हाती घेतील. यावेळी विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे पदाधिकारी किशोर ढमाले व विद्रोही १९ वे विद्रोही साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष इंजि. सतिश चकोर, निमंत्रक धनंजय बोरडे हे उपस्थित होते.

## परंडा येथे सावता परिषदेचा आठवा वर्धापन दिन साजरा



**आरंभ मराठी । परंडा**

परंडा येथे संत सावता महाराज मंदिर येथे सावता परिषदेचा अठरावा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संत सावता महाराज मंदिरात सावता माळी प्रतिमेची पूजा करून हा कार्यक्रम उत्साहात पार पाडण्यात आला. हा कार्यक्रम सावता परिषद महाराष्ट्र संस्थापक अध्यक्ष कल्याणराव आखाडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. या कार्यक्रमात विविध समाजातील उत्कृष्ट खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. ओम वाघमारे ,संस्कार गवारे ,सार्थक राऊत, प्रतीक येवारे, रोहिणी मेहर ,शिव नारायण मेहर, अथर्व जाधव, पुनिन मुजावर ,गणराज गायकवाड .अशा एकूण ११ खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी शिवाजी येवारे सावता परिषद प्रदेश संघटक' ,राहुल वाघमारे, धनंजय आदलिंगे, गणेश जमदाडे, राजु आलबते , डॉ.सोमनाथ इतापे , योगेश राऊत, संजय म्हेत्रे, धोंडीराम मोहोळकर ,नारायण मेहर, शिवाजी मेहर , अजीम मुजावर, आदी मान्यवर उपस्थित होते.

## मुरुम येथील जि.प. कन्या प्रशालेत वार्षिक स्नेहसंमेलन व विविध गुणप्रदर्शन उत्साहात

**आरंभ मराठी । मुरुम**



मुरुम शहरातील जिल्हा परिषद कन्या प्रशालेत वार्षिक स्नेहसंमेलन आणि विविध गुणप्रदर्शनांचा भव्य सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात विद्यार्थिनींनी आपल्या आवडीच्या वेगवेगळ्या गाण्यावरील नृत्याचे सादरीकरण केले. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून दीपप्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका मंकावती कांबळे या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून शाळेच्या प्राथमिकच्या मुख्याध्यापिका अलका गायकवाड, प्राथमिकचे शालेय शिक्षण समितीचे उमेश बिराजदार, माध्यमिकचे शालेय शिक्षण समितीचे गुंडू पुराणे यांच्यासह शहरातील अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्रातील सर्वच प्रकारच्या संस्कृतीच्या गीतांवर नृत्य करण्यात आले. तर कन्नड, तेलगू तसेच बंजारा गीतांवर देखील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी उत्कृष्ट नृत्यांचे सादरीकरण केले. उत्कृष्ट नृत्य करणाऱ्या यशस्वी विद्यार्थी विद्यार्थिनींना बक्षिसे देण्यात आली. यावेळी शाळेतील विद्यार्थी विद्यार्थिनी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन शाळेतील हरी शेके, बालाजी गायकवाड, डॉ. वंदना जाधव, रेणुका कुलकर्णी, बीना पोतदार, सोनाली कलशेट्टी, रोहिणी चव्हाण, सविता साळुंखे, उमाकांत महामुनी, सचिन राठोड, बालाजी कुनाळे, अशोक गायकवाड, परिचर म्हणून कार्यरत असलेल्या ललिता पवार, तात्या जाधव यांच्यासह शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात परिश्रम घेतले.

## ३४ वर्षे सेवा बजावलेले शिक्षक अब्दुल समद सय्यद सेवानिवृत्त

**शिक्षण, विद्यार्थी आणि पालकांनी दिला सन्मानपूर्वक निरोप**



**आरंभ मराठी । मुरुम**

उमरगा तालुक्यातील कोराळ गावातील जिल्हा परिषद शाळेचे ज्येष्ठ शिक्षक अब्दुल समद सय्यद यांच्या सेवानिवृत्तीचा भावनिक व उत्साहपूर्ण कार्यक्रम पार पडला. संस्थेतील शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा मोठ्या सन्मानाने साजरा करण्यात आला. सय्यद यांनी ३४ वर्षे अध्यापन क्षेत्रात काम करत विद्यार्थ्यांचे भवितव्य घडवले. त्यांच्या अथक प्रयत्नांनी शाळेच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात मोठी भर पडली. त्यांनी विद्यार्थ्यांसोबत केलेले मार्गदर्शन, शिस्तप्रियता आणि प्रेमळ स्वभाव ही शाळेची मोठी जमेची बाजू ठरली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा शाळेचे मुख्याध्यापक नरसिंग बत्तलवाड, सेवानिवृत्त शिक्षक अब्दुल समद सय्यद, त्यांच्या पत्नी शमशाद बेगम सय्यद, मुलगी आसमा सय्यद, मुलगा अब्दुल सय्यद तसेच सरपंच प्रतीनिधी बाळु सगर, बाबा कुरेशी आदी मान्यवर उपस्थित होते. सय्यद अब्दुल समद यांनी आपल्या मनोगतात म्हटले, मी या शाळेचा सदैव ऋणी राहीन. विद्यार्थ्यांच्या यशातच माझ्या अध्यापनाच्या प्रवासाचे सार्थक आहे. मला येथे मिळालेल्या प्रेम आणि सन्मानाबद्दल मी कृतज्ञ आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक चेतन गायकवाड, सूत्रसंचालन चंद्रहास कवठे यांनी केले, तर आभार प्रदर्शन बालाजी भाले यांनी केले. संपूर्ण सोहळा आनंददायी आणि संस्मरणीय ठरला. चंद्रहास कवठे, कमलाकर सोमवंशी, बालाजी भाले, चेतन गायकवाड, गुरुसिध्धा गुळवे, विजयश्री पावशेरे, मनीषा चोपडे, सेवक सखुबाई झुरळे, गीताबाई म्हस्के यांच्यासह शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## योगाच्या महिलांनी १०८ सूर्यनमस्कार करून केली रथसप्तमी साजरी

**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिव येथील योगा सेंटरच्या महिलांनी रथसप्तमीनिमित्त सलग १०८ सूर्यनमस्कार करून अनोखी आणि आगळीवेगळी अशी रथसप्तमी साजरी केली. भारतीय संस्कृतीमध्ये प्रत्येक सणाला अनन्य साधारण महत्त्व असून मकर संक्रांत हा सण संक्रांतीच्या दिवसापासून रथसप्तमीपर्यंत मोठ्या प्रमाणात आपल्याकडे साजरा केला जातो. त्यात रथसप्तमीचे विशेष महत्त्व असून सूर्याच्या उपासनेचा हा दिवस असल्याने महिला या दिवशी सूर्याची उपासना करून गोडधोड पदार्थ करतात आणि हा सण साजरा करतात. परंतु, येथील श्री योगा सेंटरच्या संचालिका कल्पना बोरा दरवर्षी रथसप्तमीनिमित्त योगा सेंटरमध्ये मोफत योगा ठेवून सलग १०८ सूर्यनमस्कार घेतात. हीच परंपरा या वर्षी देखील त्यांनी कायम ठेवली आणि महिलांसाठी आठ दिवस मोफत योगाचे प्रशिक्षण दिले. यामध्ये महिलांनी आरोग्यवर्धक असे १०८ सूर्यनमस्कार करून रथसप्तमी साजरी केली. यावेळी कल्पना बोरा म्हणाल्या की, आज याचे शल्य आहे की, महिला सर्व बाबतीत सजग असतात. परंतु स्वतःच्या आरोग्याची म्हणावी तितकी काळजी घेत नाहीत. त्यामुळे आपण खारीचा वाटा उचलावा याप्रमाणे मी सतत योगाच्या माध्यमातून महिलांना आरोग्या विषयी संदेश देत असते. यावेळी सलग न थकता १०८ सूर्यनमस्कार करणाऱ्या शोभा हनुमंत शिंदे यांचे बक्षीस देऊन कौतुक करण्यात आले. तसेच सुनीता गुंजाळ यांचा सातत्यपूर्ण योगा करत अनेकींना प्रेरणा देत असल्याबद्दल सन्मान करण्यात आला. यावेळी शहरातील महिलांनी या मोफत योगाचा लाभ घेतला.

## नळदुर्ग येथे नवीन कायद्याच्या प्रसार आणि प्रसिद्धीसाठी कार्यशाळा

**पोलीस, वकील, पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी केले नवीन कायद्याचे मंथन**

**आरंभ मराठी । नळदुर्ग**

नवीन कायदे सर्वसामान्य जनता व नागरीकांच्या हितासाठी आहेत असे तुळजापुर न्यायालयाचे सरकारी वकील अमोलसिद्ध कोरे यांनी नळदुर्ग येथे आयोजित केलेल्या नवीन कायद्याच्या प्रसार आणि प्रसिद्धीसाठी कार्यशाळा या कार्यक्रमात बोलतांना सांगितले. धाराशिव जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक संजय जाधव व अप्पर पोलिस अधीक्षक गौहर हसन यांच्या मार्गदर्शनाखाली धाराशिव जिल्हा पोलिस दलाच्या वतीने भारतीय न्याय संहिता २०२३, भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ व भारतीय साक्ष अधिनियम २०२३ या नवीन कायद्याच्या प्रसार व प्रसिद्धीसाठी जिल्हाभरात कार्यशाळेचे आयोजन करण्यात येत आहे. ४ फेब्रुवारी रोजी नळदुर्ग येथे नळदुर्ग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांनी मल्लिकार्जुन मंदिर सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. निलेश देशमुख हे होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणुन तुळजापुर न्यायालयातील सरकारी वकील ॲड.अमोलसिद्ध कोरे, ॲड.संजय गुंजकर व ॲड. तृप्ती वैद्य हे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणुन नळदुर्ग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक गजेंद्र सरोदे , पोलीस उपनिरीक्षक ईश्वर नांगरे हे उपस्थित होते. प्रारंभी सर्व मान्यवरांचा नळदुर्ग पोलिस ठाण्याच्या वतीने पोलिस निरीक्षक गजेंद्र सरोदे आणि सहाय्यक पोलिस निरीक्षक ईश्वर नांगरे यांनी सत्कार केला. यावेळी नवीन कायद्यासंदर्भात माहिती देतांना सरकारी वकील ॲड. अमोलसिद्ध कोरे यांनी म्हटले की, भारत स्वतंत्र झाल्यानंतरही इंग्रजानी तयार केलेले कायदेच अंमलात आणले जात होते. मात्र १ जुलै २०२४ पासुन भारत सरकारने नवीन कायदे अंमलात आणले आहेत. त्याचबरोबर नवीन कायद्यामध्ये कलमांची संख्या कमी करण्यात आली आहे तर गुन्ह्यामध्ये शिक्षा आणि दंडाच्या रकमेत वाढ करण्यात आली आहे. त्याचबरोबर ई –समन्स, ई –एफआयआर, ई –चार्जशीट, व्हीसी द्वारे साक्ष देण्याची व्यवस्था या नवीन कायद्यात करण्यात आली आहे. तसेच नवीन कायद्यान्वये तीन वर्षापेक्षा जास्त आणि सात वर्षापेक्षा कमी कमी शिक्षा होणाऱ्या गुन्ह्यामध्ये पोलिस आता थेट एफआयआर दाखल करू शकणार नाहीत तर यामध्ये चौकशीनंतरच गुन्हा दाखल करता येणार आहे. जुन्या कायद्यामध्ये एका लोकसेवकाविरुद्ध गुन्हा दाखल करायचा असेल तर त्यांच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी लागत होती. त्यावेळी अनेक महिने हे प्रकरण प्रलंबित राहायचे मात्र नवीन कायद्यात संबंधित वरीष्ठ अधिकाऱ्यांनी १२० दिवसाच्या आत याबाबतचा निर्णय घेणे बंधनकारक आहे. यासह अतिशय उपयुक्त अशी नवीन कायद्याची माहिती सरकारी वकील अमोलसिद्ध कोरे यांनी दिली आहे. त्याचबरोबर सरकारी वकील ॲड. संजय गुंजकर यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ व सरकारी वकील ॲड. तृप्ती वैद्य यांनी साक्ष अधिनियम २०२३ या नवीन कायद्यांची अतिशय चांगली व नागरीकांना समजेल अशा भाषेत माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार पोलिस उपनिरीक्षक ईश्वर नांगरे यांनी मानले. या कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्त्या कल्पना गायकवाड, कस्तुराबाई कारभारी, शाहेदाबी सय्यद यांच्यासह विविध गावचे पोलिस पाटील, नागरीक व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.



हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078

## विविध वृत्त...

### मुरुम येथे ग्रामीण रुग्णालयात जागतिक कर्करोग दिनानिमित्त जनजागृती



**आरंभ मराठी । मुरुम**

मुरुम शहरातील ग्रामीण रुग्णालयात जागतिक कर्करोग दिनानिमित्त धाराशिव जिल्हा शल्य चिकित्सक धनंजय चाकूरकर यांच्या सूचनेनुसार वैद्यकीय अधीक्षक एम एम आरदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली मौखिक, स्तन व गर्भाशय कर्करोग जनजागृती अभियान राबवण्यात आले. या अंतर्गत एन सी डी समुपदेशक सुजित जाधव यांनी मौखिक, स्तन आणि गर्भाशय कर्करोगाची कारणे, लक्षणे आणि प्रतिबंधात्मक उपाय यावर मार्गदर्शन केले. तंबाखू, गुटखा, अनियमित जीवनशैली आणि संसर्गजन्य कारणांमुळे कर्करोगाचा धोका वाढतो, असे त्यांनी स्पष्ट केले. या आजाराचे लक्षण व शासकीय सुविधा याविषयी माहिती देत लवकर निदान आणि योग्य उपचाराने कर्करोग बरा होऊ शकतो, असा संदेश उपस्थितांना यावेळी देण्यात आला. तसेच तंबाखूविरोधी शपथ, माहितीपत्रके आणि मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रुग्णालयातील डॉ. आदिती पलमटे, डॉ. जी एल कांबळे, सचिन तेगडे, विजयकुमार भोसले, रवी लोहार, रत्नदीप घोसले, संदिप बाबळसुरे, शीतल सुरवसे, शिल्पा हिरवे, राजश्री जाधव, सुजाता मठपती, पुष्पा गोरे, पूजा जाधव, रजिया टाकले, श्रावणी भांडे, लखन भोसले यांच्यासह रुग्णालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

### उमरगा येथील तात्यारावजी मोरे कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण



**आरंभ मराठी । उमरगा**

भारत शिक्षण संस्था संचलित तात्यारावजी मोरे कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालय उमरगा येथे भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल (भैया) शिवाजीराव मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त ३० जानेवारी रोजी महाविद्यालयामध्ये विविध कार्यक्रम घेऊन वाढदिवस साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कवलजीत बिराजदार यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचे अध्यक्ष अमोल शिवाजीराव मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय येथे आरोग्य तपासणी शिबीर व रक्तगट तपासणी शिबिर घेण्यात आले. तसेच महाविद्यालयामध्ये पर्यावरण संरक्षण काळाची गरज आहे. वृक्ष लावुन जन्मदिवस साजरा करुया वृक्षाचे संगोपन करुया तरच आपले जीवन अमुल्य प्रदुषण मुक्त होईल व शुध्द हवा मिळु शकेल, आक्सीजन मोठ्या प्रमाणात मिळेल. वृक्षारोपण वृक्षसंवर्धन एक वृक्ष आरोग्य स्वस्थ चला ही संकल्पना घेऊन महाविद्यालयाच्या औषधी वनस्पती बागेमध्ये महाविद्यालयामध्ये सर्व कर्मचारी व विद्यार्थी यांच्या वतीने अमोल शिवाजीराव मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण करून जन्मदिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी डॉ. प्रशांत माने प्रा. सूरज भगत प्रा. राजेश्री जाधव, प्रा. स्नेहल चनशेट्टी, प्रा. सौरभ साठे, प्रा. लक्ष्मण निंबाळे, प्रा.दीपक घोटाळे, संगमेश मंठाळकर श्याम मुगळे ,संदिप माने अभिमन्यु कांबळे, अमित रेड्डी गणेश सूर्यवंशी अभिजीत माने, सुहास गायकवाड, सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

### अखेर मुरुडच्या स्मशान भूमीला रस्ता मिळाला; स्मशान भूमीत सुरु असलेले गणेशलाल सोनी यांचे उपोषण स्थगित




**आरंभ मराठी । मुरुड**

मुरुड येथील सामाजिक कार्यकर्ते गणेश लाल श्रीरंग सोनी यांनी शिवाजीनगर भागातील सार्वजनिक स्मशानभूमीला रस्ता उपलब्ध करून देण्यासाठी व स्मशानभूमीच्या चतुर सीमा निश्र्चित करण्यासाठी सोमवार (दि.३) पासून स्मशानभूमीतच सुरु केलेले उपोषण प्रशासनाने रस्ता उपलब्ध करून दिल्याने मागे घेण्यांत आले. सार्वजनिक स्मशानभूमीला रस्ता उपलब्ध नसल्याने अंत्यविधीसाठी स्मशानभूमीत जाण्यासाठी अडचणी येत होत्या. तसेच स्मशानभूमीच्या चतुर सीमा कायम नसल्याने स्मशानभूमीला कंपाउंड घेण्यास अडचण येत असल्याचे श्री सोनी यांनी प्रशासनाला दिलेल्या निवेदनात त म्हटले होते. मुरुड हे जवळपास ४० हजार लोकसंख्या वस्ती असलेले गाव आहे. परंतु, या गावच्या स्मशानभूमीच्या रस्त्याचा आणि चतुर सीमेचा प्रश्न गेल्या अनेक दिवसापासून प्रलंबित असल्याने स्मशानभूमीचा विकास करण्यास अडथळा निर्माण होत असल्याचेही सोनी यांनी सांगितले होते. गेले दोन दिवस गावातील अनेक प्रतिष्ठित नागरिक, माता भगिनी विद्यार्थी व युवक यांनी मोठ्या प्रमाणात उपोषणाला भेट देऊन पाठिंबा दर्शवला होता. याची दखल घेऊन तहसील कार्यालय , पंचायत समिती कार्यालय , मुरुड पोलीस स्टेशन व ग्राम पंचायत यांनी पुढाकार घेऊन रस्ता उपलब्ध करून दिल्याने गणेश लाल सोनी यांनी मान्यवरांच्या हस्ते ज्यूस घेऊन उपोषण स्थगित केले.

# विद्यार्थ्यांनी बनवल्या सिमेंटच्या कुंड्या

### अनुभवातून मिळाल्या ज्ञानाच्या हंड्या..!

### केमवाडी जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांसाठी अभिनव उपक्रम

**आरंभ मराठी । केमवाडी**

केमवाडी जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांसाठी अभिनव उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या अंगी कार्यानुभव कला येण्याच्या अनुषंगाने प्रयत्न केले जातात त्याचाच भाग म्हणून शाळेतील सर्व शिक्षक व इयत्ता सहावी व सातवीतील विद्यार्थ्यांना सिमेंट पासून शालेय सुशोभीकरणासाठी लागणाऱ्या कुंडया कशा बनवाव्यात याची कार्यशाळा येथील उपक्रमशील शिक्षक हरिश्चंद्र खेंदाड यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. या कार्यशाळेत मिळालेल्या ज्ञानाचा व प्रत्यक्ष अनुभवाचा उपयोग करत इ.सहावी च्या विद्यार्थ्यांनी दररोज सकाळी एक कुंडी भरणे व दुसऱ्या दिवशी सकाळी ती भरलेली कुंडी काढणे असे करत दररोज फक्त पंधरा मिनिटात एक कुंडी तयार करून अशा एकूण १६ कुंडया विद्यार्थ्यांनी तयार केल्या आहेत. यावेळी प्रभारी मुख्याध्यापक सुधीर जाधव, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सर्जे राव पाटील, सरपंच गजानन कोकरे, एसएमसीचे सर्व सदस्य, सर्व शिक्षक वृंद व पालक वर्गाने या उपक्रमाचे कौतुक केले.



#### उपक्रमाचा फायदा

कार्यानुभवाच्या तासिकेत विद्यार्थ्यांची जिज्ञासा वाढीस लागून नवनवीन पूरक उपक्रम घेतल्याने विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली. हस्तकला व कार्यानुभवामध्ये विद्यार्थ्यांच्या कृतीला प्राधान्य दिले गेल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर स्वनिर्मितीचा एक वेगळाच आनंद दिसून आला. रंगकामाने सौंदर्यात भर पडली. मुलांनी तयार केलेल्या कुंडयांचे सौंदर्य अधिक खुलून दिसावे म्हणून मुलांनी कुंडयांना आकर्षक रंग देऊन शाळा सौंदर्यात भर घालण्याचा प्रयत्न करत प्रात्यक्षिकाचा आनंद घेतला.

#### असे आहेत अभ्यासक्रमीय संदर्भ

सहावी वर्गाच्या कार्यानुभव विषयातील निवारा क्षेत्रातील घटक क्र.२ प्लास्टर ऑफ पॅरिस किंवा सिमेंट पासून पसरट गोलाकार साच्यातून तयार करणे व कला शिक्षणातील रंगकाम या घटकाला न्याय देत हा उपक्रम हाती घेतल्याचे वर्ग शिक्षक खेंदाड यांच्याकडून सांगण्यात आले.

#### असा केला वापर

कार्यानुभवातून तयार केलेल्या कुंडया शालेय सुशोभीकरणासाठी करत त्यामध्ये फुलझाडे जास्वंद, गुलाब, स्नेक प्लँट ,औषधी वनस्पती इत्यादी वनस्पतीची लागवड करून विद्यार्थ्यांना वनस्पतींचा लळा लावून पर्यावरणाचा लळा लागण्यात वापर होऊ लागला.

#### कार्यानुभव शिक्षणाचा आनंद घेतला



कार्यानुभवामुळे आम्हा विद्यार्थ्यांना आमच्या आवडीच्या विषयात आनंददायी शिक्षण मिळाले. प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी अशी संधी सरांनी आम्हांला उपलब्ध करून दिली,खूप छान वाटत आहे.

**– नागनाथ ताटे ( इ.६ वी )**

#### वेगळा अनुभव मिळालं



अभ्यासा बरोबरच एखादा छंद जोपासणे मनाला गरजेचे आहे आणि तो कसा जोपासावा हे आम्हांला आमच्या सरांकडून शिकायला मिळाले. खूप छान आणि वेगळ काहीतरी पहायला मिळलं

**– श्रेया काशिद ( इ.६ वी )**

प्रभारी मुख्याध्यापक सुधीर जाधव शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सर्जेराव पाटील,सरपंच गजानन कोकरे एसएमसीचे सर्व सदस्य, सर्व शिक्षक वृंद व पालक वर्गातून सदरील उपक्रमाचे अभिनंदन होत आहे.

### शिवजन्मोत्सव समितीच्या अध्यक्षपदी रामहरी अंबर, उपाध्यक्षपदी महेश पाटील तर सचिव किरण जाधव



**आरंभ मराठी । मुरुम**

मुरुम शहरातील सर्वात जुने व प्रतिष्ठित असलेल्या किसान चौक येथील शिवजन्मोत्सव सोहळा समितीच्या वतीने शिवजन्मोत्सव सोहळ्याच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडीनिमित्त बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीमध्ये शिवजन्मोत्सव सोहळा समितीचे अध्यक्ष म्हणून रामहरी अंबर, उपाध्यक्ष महेश जाधव-पाटील तर सचिव म्हणून किरण जाधव यांची सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली. किसान चौक येथील शिवजन्मोत्सव सोहळा समितीच्या वतीने अनेक सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक उपक्रम राबवत शिवजन्मोत्सव सोहळ्यात विविध कलागुणांना वाव देत अनेकांना आपापल्या क्षेत्रात संधी निर्माण करून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे. या सोहळा समितीच्या वतीने काढण्यात येणाऱ्या भव्य मिरवणुकीच्या माध्यमातून शिवकालीन ऐतिहासिक मर्दानी खेळांचे प्रदर्शन करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा जागर केला जातो व ती परंपरा आजही उत्साहाने जपली जाते. अशा प्रतिष्ठित मंडळाच्या पदाधिकारीपदी निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचे समितीच्या वतीने अभिनंदन करून शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी शिवजन्मोत्सव सोहळा समितीचे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

### रुपामाता अर्बनतर्फे आयोजित मकर संक्रांत हळदी- कुंकू कार्यक्रम येडशी येथे उत्साहात

**आरंभ मराठी । येडशी**

रुपामाता अर्बन को. ऑप. क्रे. सो. लि. धाराशिव शाखा येडशी यांच्या वतीने आयोजित मकरसंक्रांतीनिमित्त हळदी कुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

### प्रधानमंत्री आवास योजना २.० मोफत नोंदणी शिबिरास तुळजापुरात सुरुवात



**आरंभ मराठी । तुळजापूर**

तुळजापूर शहरातील असे नागरिक ज्यांना स्वतःची जागा आहे, परंतु पक्के घर नाही अशा कुटुंबाकरिता पंतप्रधान आवास योजना २.० जाहीर केलेली असून तालुक्याचे आमदार राणा जगजीतसिंह पाटील यांच्या आदेशाने व विनोद गंगणे यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टीच्या वतीने अपसिंगा रोड मोतीझरा लमान तांडा येथे प्रधानमंत्री आवास योजनेच्या २.० लाभार्थ्यांचे मोफत नोंदणी शिबिर आयोजित करण्यात आले. यामध्ये लाभार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला व नोंदणी करून घेण्यास सुरुवात करण्यात आली. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती सुहास गायकवाड, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष संदीप गंगणे, शहर सरचिटणीस धैर्यशील दरेकर, युवा मोर्चा शहराध्यक्ष राम चोपदार, दिनेश क्षीरसागर, इंद्रजित सांळुके, सागर पारडे, लालसिंग पवार, नितीन पवार, रमेश राठोड, सुरेखा पवार, अनुराधा चव्हाण, ताईबाई पवार, सिमा पवार, सोनाबाई पवार, कमलबाई पवार, विमल पवार परिसरातील नागरिक महिला आदी उपस्थित होते.

### तेर येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेत गजबजला बाल आनंद बाजार

**आरंभ मराठी । तेर**

विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनातील मनावरील असलेला अभ्यासक्रमाचा मानसिक ताणतणाव दूर करुन विरंगुळा मिळावा व त्यांच्यातील अंगीकृत सुप्त कलागुणांना वाव देता यावा तसेच प्रत्यक्ष कृतीतून व्यवहार ज्ञानाचे शिक्षण देण्यासाठी तेर येथील पी.एम.श्री जिल्हा परिषद उर्दु प्राथमिक व माध्यमिक शाळेमध्ये बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याचे उद्घाटन गट शिक्षणाधिकारी हाजी सय्यद असरार अहेमद यांच्या हस्ते करण्यात आले.
प्रमुख पाहुणे म्हणून विस्तार अधिकारी रामचंद्र शिंदे, मधुकर तोडकर, यांची प्रमुख उपस्थिती होती. जि.प.उर्दू शाळेत विध्यार्थ्यांच्या अंगी व्यवसाय करण्याची सवय लागावी म्हणून खरी कमाई उपक्रमाचे आयोजन केले होते. या उपक्रमात विविध प्रकारचे ५१ विक्री स्टॉल उभारले होते. शाकाहारी मांसाहारी स्टॉल वरून विध्यार्थी, पालक, शिक्षक यांनी खरेदी करून पदार्थांचा आस्वाद घेतला. यावेळी समितीच्या अध्यक्षा शेख परवीन समद, उपाध्यक्ष मुकतार काझी, ग्रामपंचायत सदस्य बापूराव नाईकवाडी, शिक्षण तज्ञ सदस्य जुनेद मोमीन, खालेद काझी, अर्शद मुलांनी, शाकेर मुलांनी, मोहियोद्दीन ,



मुस्कान मुलानी, रेश्मा रियाज कबीर , मुझम्मिलबेगम काझी, शाळेचे मुख्याध्यापक तय्यब अली शहा उपस्थित होते. मो. इकबाल अली, मोमिन कलीम, फुलमामडी तौफीकुलआलम, चौधरी शमसोद्दीन खतीब मुमताज अर्शिया शेख, अन्सारी एखलास, रेश्मा शहा, मौला शेख यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. यावेळी विद्यार्थ्यांच्या बाल आनंद मेळाव्याची उलाढाल सरासरी ८० ते ९० हजार झाल्याचे शाळेने सांगितले. कार्यक्रमाची प्रस्तावना शाळेचे मुख्याध्यापक तय्यबअली शहा यांनी केली तर सूत्रसंचालन मौला सर यांनी केले.

### न. प. शाळा क्र.११ शाळेचे क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत घवघवीत यश

**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिव येथील समता नगर येथील नगर परिषद प्राथमिक शाळा क्रमांक ११ या शाळेतील विद्यार्थ्यांनी क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत घवघवीत यश मिळवले. विद्यार्थ्यांमध्ये खो-खो स्पर्धेत मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक तर मुलांच्या संघाने द्वितीय क्रमांक पटकाविला. तसेच थ्रो बॉल स्पर्धेत मुलींच्या संघाने द्वितीय व क्रिकेटमध्ये मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक पटकाविला. वैयक्तिक क्रीडा प्रकारात आलिया फारुख मुजावर हिने १०० मीटर धावण्याच्या प्रथम तर मोठ्या गटात ऐश्र्वर्या राम घोडके या विद्यार्थिनीने द्वितीय क्रमांक तसेच २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत तस्मिया फारूक मुजावर हिने प्रथम क्रमांक मिळविला. या यशाबद्दल नगर परिषद शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी तथा उपमुख्याधिकारी



पृथ्वीराज पवार यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा ट्रॉफी व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. यासाठी शाळेचे मुख्याध्यापक ए ए लावंड, मार्गदर्शक शिक्षक बी.यु. शेंडगे, डी एम खारे, जे पी अडसुळ, के के पवार, ए डी जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. यासाठी शिक्षक यु ई जोगदंड यांचे सहकार्य मिळाले.

### कळंब येथील जनकल्याण अर्बन बँक बँको ब्लू रिबन पुरस्काराने सन्मानित

**आरंभ मराठी । कळंब**

कळंब शहरात स्थापना झालेल्या आणि सद्या धाराशिव, तुळजापूर, लातूर, उदगीर, अंबेजोगाई व बार्शी अशा विविध ठिकाणी शाखांचा विस्तार केलेल्या कळंब येथील जनकल्याण अर्बन को-ऑप बँक लि. या बँकेला सन २०२४ च्या बँको ब्लू रिबन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. रिझर्व बँकेचे सर्व नॉर्म्स व्यवस्थितरित्या अवलंबलेल्या बँका आणि ज्या बँकांना ऑडीटमध्ये सतत अ वर्ग प्राप्त होतो अशा बँकेस हा पुरस्कार प्रदान केला जातो. यासाठी राज्यभरातून अनेक सहभागी बँकामधून जनकल्याण अर्बन को-ऑप बँक लि. कळंब या बँकेला हा पुरस्कार मिळाला




आहे. विविध श्रेणी मधून ७५ ते १०० कोटी या श्रेणीत हा पुरस्कार जनकल्याण बँकेला मिळाला आहे. हा पुरस्कार सोहळा अम्बी व्हॅली सिटी, लोणावळा येथे मोठ्या उत्साहात पार पडला. सहकारी बँकांसाठी लोणावळा येथे अडव्हांटेज सहकार परिषद पार पडली. या परिषदेमध्ये रिझर्व बँकेचे माजी सरव्यवस्थापक भार्दे श्र्वर बॅनर्जी यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. जनकल्याण बँकेचे संस्थापक अध्यक्ष उमेश विठ्ठलराव कुलकर्णी व त्यांच्या पत्नी वैशाली उमेश कुलकर्णी यांनी हा पुरस्कार स्वीकारला.
बँकेतील सर्व संचालकाचे व अध्यक्षाचे बँकेसाठी असलेले भरीव योगदान, समन्वय, बँकेचा पारदर्शक कारभार, ग्राहकांचे हित, सहकार खाते व रिझर्व बँक यांच्या सर्व नियमांची पूर्तता बँकेने केलेली असल्यामुळे सदर पुरस्कार प्राप्त झाल्याचे मत बँकेचे अध्यक्ष उमेश कुलकर्णी यांनी व्यक्त केले. पुरस्काराने बँक सन्मानित झाली याचे सर्व श्रेय बँकेचे खातेदार, सभासद, ठेवीदार, हितचिंतक यांचे असल्याचे बँकेचे अध्यक्ष उमेश कुलकर्णी यांनी सांगितले.

## राष्ट्रप्रेमी युवक व संविधानामुळेच भारतीय लोकशाही मजबूत

### मुरूम येथील संविधान जागर अभियानात मोहन जाधव यांचे प्रतिपादन

**आरंभ मराठी । मुरूम**

राष्ट्रप्रेमी युवक आणि संविधानामुळेच भारतीय लोकशाही आज मजबूत असून, भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश ठरला असल्याचे प्रतिपादन पत्रकार मोहन जाधव यांनी केले. भारतीय संविधानाला नोव्हेंबर २०२५ मध्ये अमृत महोत्सवी ७५ वर्षे पूर्ण होत असल्याने २०२४-२५ हे संपूर्ण वर्ष भारतीय संविधानाचे महत्त्व सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याच्या हेतूने श्री माधवराव पाटील महाविद्यालयात संविधान जागर अभियान राबवले जात आहे त्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी भित्तिपत्रकाचे उद्घाटन फीत कापून बुधवारी (ता. ५) रोजी प्राचार्य डॉ. अशोक सपाटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रतिभा निकेतन कनिष्ठ महाविद्यालयाचे राज्यशास्त्र विषयाचे प्रा. दिपक सांगळे, भूगोल विषयाचे प्रा. अमोल गायकवाड, दैनिक आरंभ मराठीचे तालुका प्रतिनिधी मोहन जाधव, मराठा सेवा संघाचे पदाधिकारी संजय सावंत, माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसीचे समन्वयक प्रा. डॉ. रवींद्र आळंगे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. डॉ. सायबण्णा घोडके, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे, डॉ. रवींद्र गायकवाड, प्रा. राजकुमार रोहीकर आदींची प्रमुख उपस्थिती




होती. याप्रसंगी सामूहिक संविधानाचे वाचन करण्यात आले. यावेळी मोहन जाधव संविधानाबद्दल म्हणाले की, मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली २ वर्षे, ११ महिने आणि १८ दिवसांच्या मेहनतीनंतर हे संविधान तयार झाले. यामध्ये लोकशाही, स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता यासारख्या मूलभूत तत्वांना प्राधान्य देण्यात आले आहे. यावेळी डॉ. घोडके यांनीही मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्राचार्य सपाटे यांनी संविधानाचे सर्वांनी आचरण करणे गरजेचे असल्याचे म्हटले.
या कार्यक्रमासाठी डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी, डॉ. राम बजगिरे, डॉ. रमेश आडे, डॉ. अरुण बावा, डॉ. सुजित मटकरी, डॉ. किरण राजपूत, डॉ. अविनाश मुळे, डॉ. संध्या डांगे, प्रा. अजिंक्य राठोड, प्रा. लखन पवार, अमोल कटके आदींनी पुढाकार घेतला. प्रास्ताविक प्रा. डॉ. महेश मोटे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले तर आभार प्रा. डॉ. रवींद्र आळंगे यांनी मानले. यावेळी फार्मसी कॉलेज व महाविद्यालयातील प्राध्यापक-प्राध्यापिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विविध शाखेतील बहुसंख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# ३४ रुपयांचे प्रमाणपत्र १०० रुपयाला

## वा...रे आपले सरकार सेवा केंद्र !

### शासकीय दरफलक केंद्राच्या दर्शनी भागाला दिसेना

### आपले सरकार सेवा केंद्रातून नियमबाह्य मेवा

अभिजीत साळुंके । आरंभ मराठी

**लोहारा : नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ घेण्याकरिता विविध प्रमाणपत्रांची आवश्यकता असते. त्यामुळे सर्व प्रमाणपत्रे एकाच जागेवरून वाजवी दरामध्ये उपलब्ध व्हावीत, या उद्देशाने शासनाने आपले सरकार सेवा केंद्र सुरू केले; पण लोहारा तालुक्यात हे केंद्र वाटप करताना खैरातच वाटल्याचा प्रकार दिसून येत असून, सेवा केंद्राच्या नावावर दुकानदारी सुरू केली आहे. शासकीय नियमांना तिलांजली देत काहींनी लूट चालविली आहे. लोहारा तालुक्यातील तीन सेवा केंद्रांवर आमच्या प्रतिनिधीने भेट देऊन वास्तव जाणले असता ३४ रुपयांच्या प्रमाणपत्राकरिता चक्क १०० रुपये घेतल्याचे निदर्शनास आले.**

आपले सरकार सेवा केंद्राच्या माध्यमातून जवळपास २९ ते ३० प्रकारची प्रमाणपत्र दिली जातात. याकरिता शासनाने दरही ठरवून दिले आहेत. त्यानुसार प्रत्येक केंद्र चालकाला शासकीय दरफलक केंद्राच्या दर्शनी भागावर लावणे बंधनकारक आहे. पण, भेटीदरम्यान सेवा केंद्रापुढील दर फलक गायब झाल्याचे निदर्शनास आले. यासोबतच प्रमाणपत्राकरिता ग्राहकांकडून दुप्पट –तिप्पट रक्कम आकारली जात असल्याचे चित्र दिसत होते. सोबतच घेतलेल्या पैशाची कुठलीही पावती ग्राहकांना दिली जात नसल्याने ग्रामीण भागातील सर्वसामान्यांची मोठ्या प्रमाणत लूट होत आहे. तसेच सेवा केंद्राच्या माध्यमातून ग्रामीण भागातील सर्वसामान्यांची मोठ्या प्रमाणात फसवणूक केली जात असल्याचे दिसून येत आहे.




### असे आहेत शासकीय दर

- २४ रुपये – सातबारा, आठ अ नमुना, आम आदमी विमा योजना
- ३४ रुपये – सर्वसाधारण प्रतिज्ञापत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, वंशावळी प्रतिज्ञापत्र व अधिवास प्रमाणपत्र, वारसा प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेयर, जातीचे प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, शेतकरी प्रमाणपत्र, अल्पभूधारक प्रमाणपत्र भूमिहीन प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र, आदी.
- ५८ रुपये – नॉन क्रिमिलेयर प्रतिज्ञापत्र, नॉन क्रिमिलेयर नूतनी करण, जातीचे प्रमाणपत्र प्रतिज्ञापत्र, आदी.

### केंद्र चालकांनी नियम पाळावे, अन्यथा कारवाई

प्रत्येकाने केंद्राच्या दर्शनी भागावर विविध प्रमाणपत्रासाठी असलेल्या शासकीय दराचे फलक लावणे बंधनकारक आहे. प्रमाणपत्राचे प्रिंटेड टोकण असते. ते ग्राहकांना द्यायला पाहिजे. तसेच शासकीय दरानुसारच लाभार्थ्यांनीही पैसे द्यायला पाहिजे. अशा काही तक्रारी असतील तर पुराव्यासह सादर कराव्यात. त्यांच्यावर योग्य ती कारवाई केली जाईल. मागे तिघांवर कारवाई करून केंद्र बंद करण्यात आली. आहेत.

**–रणजितसिंह कोळेकर**
**तहसीलदार, लोहारा.**

### ‘आरंभ मराठी’च्या पाहणीतून समोर आलेला प्रकार

केंद्र क्रमांक : ०१

एका केंद्रात पाहणी केली असता प्रमाणपत्रांसाठी नागरिकांची गर्दी दिसून आली. यात जास्त ग्रामीण भागातील महिला व पुरुषांचा समावेश होता. या केंद्राच्या दर्शनी भागावर नियमित दराचा फलक नव्हता. येथे प्रमाणपत्रासाठी एका ज्येष्ठ नागरिकाकडून ३४ रुपयांऐवजी १०० रुपये घेण्यात आले. ग्राहकांकडूनही दुप्पट–तिप्पट रक्कम आकारली जात असल्याचे चित्र होते. सोबतच घेतलेल्या पैशाची कुठलीही पावती ग्राहकाला दिली जात नसल्याचे दिसून आले.



केंद्र क्रमांक : ०२

दुसऱ्या सेवा केंद्रात लाभार्थी म्हणून पाहणी केली असता एका व्यक्तीने रहिवासी प्रमाणपत्र काढले. यासाठी संबंधित व्यक्तीने किती पैसे झाले असे विचारले तर ७० रुपये सांगितले. ग्राहकाने दोनशे रुपयांची नोट दिली असता १३० रुपये त्याला परत करण्यात आले. या ठिकाणीही दरफलक दिसून आला नाही.

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी १३ कोटींचा निधी द्या

### आमदार कैलास पाटील यांची सामाजिक न्याय मंत्री सिरसाठ यांच्याकडे मागणी

आरंभ मराठी । धाराशिव



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मौजे कसबे तडवळा ता. जि. धाराशिव येथे दिनांक २२ व २३ फेब्रुवारी १९४१ रोजी महार मांग वतनदार परिषद घेतली होती. त्याकरिता त्यांनी मौजे कसबे तडवळा ता. जि. धाराशिव येथे मुक्काम देखील केला होता. महाराष्ट्र राज्यातील एकुण २८ ऐतिहासिक व सांस्कृतीक स्थळे/ ठिकाणे निवड केली आहे. मात्र जागेअभावी हा प्रश्र्न रखडला होता पण त्यावर मार्ग काढून त्याचा प्रस्ताव सोळा महिन्यापासून सरकार दरबारी पडून आहे. त्याला मंजुरी देऊन ही कामे अधिक गतीने करावी अशी मागणी आमदार कैलास पाटील यांनी सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ यांच्याकडे केली आहे. त्यांची भेट घेऊन आमदार पाटील यांनी संपूर्ण माहिती दिली आहे.

पाटील यांनी म्हटले की, कसबे तडवळे ता.धाराशिव येथील सार्वजनिक वाचनालय, क्रांतीस्तंभ व इतर कामासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असुन सदर प्रकल्पासाठी आयुक्तालयाकडुन निधी वितरण करण्यात आलेला आहे.

कसबे तडवळे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने सार्वजनिक वाचनालय व क्रांतीस्तंभ जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या जागेवर बांधण्याकरिता पर्यायी जागा उपलब्ध नाही. त्यामुळं स्मारकाचे काम रखडले. समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त यांनी १२ ऑक्टोबर २०२२ रोजी जिल्हा प्रशासनातील अधिकारी, गावकरी व सामाजिक कार्यकर्ते यांच्या समवेत कसबे तडवळे येथे बैठक घेतली. बैठकीमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अन्य ठिकाणी बांधुन दिल्याशिवाय स्मारकाचे काम होणार नाही असे जिल्हाधिकारी, धाराशिव यांनी कळविण्यात आले.

जिल्हा परिषद शाळा बांधणेसाठी व येथील जागा भुसंपादनाच्या नुकसान भरपाईसह मावेजा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय झालेला आहे. शाळेची इमारत बांधकामासाठी दहा कोटी ८६ लाख व जागेचा मावेजा एक कोटी ९७ लाख असे एकुण १२ कोटी ८३ लाख रुपये रक्कम वितरीत करण्याबाबतचा प्रस्ताव आपल्या कार्यालयास २० ऑक्टोबर २०२३ रोजी प्राप्त झाला असल्याच आमदार पाटील यांनी सांगितले. हा प्रस्ताव मागील एक वर्ष चार महिन्यांपासून आपल्या कार्यालयाकडे प्रलंबित असुन त्यावर अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.या प्रस्तावाला मान्यता देऊन तात्काळ निधी वितरीत करणे आवश्यक आहे. याबाबत या विभागाशी मी वेळोवेळी पत्राव्दारे मागणी केले असल्याच पाटील यांनी म्हटले आहे. कसबे तडवळे ता. धाराशिव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या इमारत बांधकामासाठी निधी मंजुर करण्याचा प्रस्तावास मंजुरी द्यावी अशी मागणी आमदार पाटील यांनी मंत्री ना. शिरसाठ यांच्याकडं केली आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज चौकात १५१ फूट भव्य भगवा ध्वज उभारणार–पालकमंत्र्यांची मंजुरी

आरंभ मराठी । धाराशिव



शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात १५१ फूट उंच भव्य दिव्य भगवा ध्वज उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांनी पालकमंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेतली. या भेटीत पालकमंत्री सरनाईक यांनी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून या प्रस्तावास मंजुरी देण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी मध्यवर्ती शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष संदीप इंगळे, सुनील काकडे, अभय इंगळे, आकाश कोकाटे, कमलाकर दाने, यश हंचाटे, समर्थ कोकाटे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.या भगव्या ध्वजामुळे छत्रपती शिवाजी महाराज चौकाचा ऐतिहासिक व राष्ट्रभक्तीपूर्ण वारसा अधिक उजळणार असून, तो धाराशिव शहराचे नवसंस्कृतीक प्रतीक ठरणार आहे.

## उमाजी नाईक यांना मानवंदना



जेजूरी येथे नरवीर उमाजीराजे नाईक यांच्या १९३ व्या पुण्यतिथीनिमित्त श्री खंडोबा मंदिर पायरी मार्गांवरील पुतळ्यास विश्र्वस्त मंडळ व रामोशी समाज बांधवानी पुष्पवृष्टी करुन दिली मानवंदना दिली.

## पुरस्कार प्राप्त रकमेतून १११ जेष्ठ नागरीकांना रेडिओचे वाटप

आरंभ मराठी । तुळजापूर

तुळजापूर खुर्द येथील तुळजाई सांस्कृतिक व क्रीडा मंडळास महाराष्ट्र राज्य शासन आयोजित लोकमान्य टिळक उत्कृष्ट गणेश मंडळ स्पर्धेत यावर्षीचा धाराशिव जिल्ह्याचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला होता. पुरस्कार स्वरुपात मिळालेल्या रकमेतून समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास जेष्ठ अशा १११ नागरिकांना रेडिओचे वाटप सामजिक बांधिलकीच्या भावनेतून तुळजापूर खुर्द येथे करण्यात आले. मनोरंजन व ज्ञान वृद्धी करीता रेडिओ हे एक स्वस्त व प्रभावी माध्यम केंद्र व राज्य शासनाच्या वतीने सूरू असलेल्या विविध योजना, सवलतींची परीपूर्ण माहीती मिळते. या कार्यक्रमावेळी व्यासपीठावर आकाशवाणी धाराशिवचे प्रमुख किरण पवार, रेडिओ तेरणाचे संजय मैंदग्रीकर, तुळजाई पतसंस्थेचे चेअरमन राजेंद्र देशमाने, जेष्ठ नागरीक व तुळजाई मंडळांचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## परंडा येथील रा गे शिंदे महाविद्यालयात पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

### नामांकित आस्थापनात २१२ जागांची होणार भरती

आरंभ मराठी । परंडा

परांडा येथील श्री भवानी शिक्षण प्रसारक मंडळ धाराशिव संचलित शिक्षण महर्षी गुरुवर्य रा गे शिंदे महाविद्यालय शनिवारी (दि.८) जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र धाराशिव आणि शिक्षण महर्षी गुरुवर्य रा.गे शिंदे महाविद्यालय परंडा अंतर्गत आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यामध्ये २१२ विद्यार्थ्यांना नोकरीची संधी प्राप्त होणार आहे. संस्थेचे सचिव संजय निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य डॉ सुनील जाधव यांच्या अध्यक्षतेखाली या रोजगार मेळाव्याचे आयोजन केले आहे. या मेळाव्यामध्ये एकूण १२ आस्थापना सहभागी होणार आहेत. कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र धाराशिव येथील सहाय्यक आयुक्त संजय गुरव यांनी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यासाठी परवानगी दिली आहे. दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर पदवी झालेल्या विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळणार आहे. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी, शहरातील व तालुक्यातील तरुण–तरुणी सुशिक्षित बेरोजगार यांनी या संधीचा फायदा करून घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुनील जाधव यांनी केले आहे.

## शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅक योजनेची नोदणी करावी – कृषी सहाय्यक सुहास गुंड

आरंभ मराठी । अनाळा

परंडा तालुक्यातील साकत (खु), साकत बु ,पिस्तमवाडी, रोहकल येथील शेतकऱ्यांनी ग्रीस्टॅक योजनेची नोंदणी सीएससी केंद्रांवर करून घ्यावी. ॲग्रीस्टॅक योजनेची नोंदणी नि:शुल्क आहे. शेतकऱ्यांना अधिक समृध्द आणि सशक्त बनविण्यासाठी केंद्र शासन व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकरी माहिती संच, हंगामी पीक माहिती संच व भूसंदर्भीय भूभाग माहिती संच निर्मिती म्हणजेच ॲग्रीस्टॅक ह्या संकल्पने ची तालुक्यात अंमलबजावणी सुरु झाली आहे.

या योजनेव्दारे शेतकऱ्यांना ओळख (फार्मर आयडी) दिला जाणार आहे. ग्रीस्टॅक फार्मर आयडीमुळे शेतकऱ्यांना प्रधानमंत्री किसान सन्मान निधीचा लाभ, पिक कर्ज, अचूक हवामान अंदाज, मृदा आरोग्य तपशील आणि योग्य पीक सल्ला मिळणार आहे. तसेच पीक विमा योजनेचा लाभ घेणे सोपे होणार आहे. पिक विमा तसेच आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत शेतकऱ्यांना नुकसान भरपाई तसेच डिजिटल पीक कर्ज मिळवणेही या आयडीमुळे मिळवणे सोपे होणार आहे. रोहकल साकत बु, साकत खु ,पिस्तमवाडी येथील सर्व शेतकऱ्यांनी शासनाच्या या दूरदृष्टी योजनेचा फायदा घेवुन जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी




शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) तयार करुन घ्यावेत. असे आवाहन परंडा तालुका कृषी अधिकारी नानासाहेब लांडगे यांच्या मागदर्शनाखाली कृषी सहायक सुहास गुंड यांनी केले आहे.

## ‘कोयना काठ’ वृक्षतोड प्रकरणी वनविभागाची बघ्याची भूमिका

### बेकायदेशीर वृक्षतोडप्रकरणी कारवाई शून्य

आरंभ मराठी । सातारा

कोयना विभागातील वांझोळे (ता. पाटण) येथील कोयना काठावरील बेसुमार केलेल्या वृक्षतोडप्रकरणी वन विभागाने कोणतीही कारवाई केली नसून वन विभागाकडे कारवाई संबंधी कोणतीही माहिती उपलब्ध नाही.हा प्रकार गंभीर असून बेकायदेशीरपणे वृक्षतोड करणाऱ्या व्यापाऱ्यांना वन विभाग अभय देतो की काय ? हा प्रश्न सध्या निर्माण झाला आहे.दोन दिवस उलटून गेले



तरी या प्रकरणी कोणतीही कारवाई वनविभागाकडून करण्यात आली नाही. पर्यटनाची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोयना विभागातील वांझोळे येथे मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात आली आहे. पर्यटनाच्या दृष्टीने संवेदनशील म्हणून कोयना कोयना नगर परिसर ओळखला जातो.राज्याचे पर्यटन विकासमंत्री शंभूराज देसाई यांनी राज्याचे पर्यटन धोरण ठरविताना महाबळेश्वर ते

### कारवाई करा

झाडे तोडणे हे पर्यावरणाच्या दृष्टीने हानीकारक असून वांझोळे येथे झालेल्या वृक्षतोडीवर वन विभागाने कारवाई करून गुन्हा दाखल करावा.

**–हेमंत केंजळे,**
**पर्यावरण अभ्यासक**

------------------------

पाटण या परिसरामध्ये नवीन महाबळेश्वर प्रकल्पाची घोषणा केली आहे. यासाठी आग्रही असणाऱ्या मंत्री शंभूराज देसाई यांच्या मतदारसंघांमध्येच मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर वृक्षतोड होत आहे.माध्यमातून बातम्या आल्या तरी बेकायदेशीर वृक्षतोड प्रकरणी कारवाईचे अधिकार असणारा वन विभाग मात्र या वृक्षतोड प्रकरणी सुस्त आहे. कोयना विभागातील हेळवाक ते निसरे दरम्यान कोयना नदी काठावर जल पर्यटन करण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई आग्रही आहेत. या जल पर्यटनासाठी निधी मंजूर झाला आहे तर या जल पर्यटनातून प्रचंड मोठ्या प्रमाणात तालुक्यात पर्यटकांसाठी पर्यटन उपलब्ध होणार आहे. महाबळेश्वर येथील मुनावळेच्या धर्तीवर होणाऱ्या जल पर्यटनासाठी टेंडर प्रक्रिया ही अंतिम झाली असून, या जल पर्यटनाचे काम लवकरच सुरू होणार आहे. मात्र पर्यटनाला पूरक असणाऱ्या याच भागामध्ये सध्या लाकूड व्यापाऱ्यांकडून प्रचंड मोठ्या प्रमाणात वृक्षतोड सुरू आहे. झालेल्या वृक्षतोडीवर वन विभागाने कारवाई करावी, अन्यथा याप्रकरणी आम्हाला वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे न्याय मागावा लागेल असा इशारा पर्यावरण प्रेमींकडून देण्यात आला आहे.

## शेतकऱ्यांचे ऊस बिल थकवणाऱ्या साखर कारखान्यांवर कारवाईची मागणी

आरंभ मराठी । तुळजापूर

धाराशिव जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असून, अनेक साखर कारखान्यांकडून ऊस बिल वेळेवर अदा करण्यास टाळाटाळ केली जात आहे. या पार्श्वभूमीवर आम आदमी पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष मधुकर शेळके यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. एफआरपी कायद्यानुसार गळीत हंगाम संपल्यानंतर १४ दिवसांच्या आत ऊस बिलाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणे बंधनकारक आहे.

मात्र अनेक खाजगी आणि सहकारी साखर कारखान्यांकडून या नियमांचे उल्लंघन होत असून, शेतकऱ्यांना त्यांचा मेहनतीचा मोबदला मिळत नाही परिणामी शेतकऱ्यांवर कर्जबाजारी होण्याची वेळ येत आहे. जिल्ह्यातील सर्व साखर कारखान्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांची थकीत बिले तातडीने अदा करावीत अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा शेळके यांनी दिला आहे यावेळी सुहास कानडे, विकास घोडके, रोहित शेंडगे, कृष्णा मोरे उपस्थित होते.